# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

पीबीएक्स ०२० – २६१२३९८५ /२६१२६७८५/ २६११४०६४/ फॅक्स ०२० – २६१२७००४/२६१३२४०१.

Email: - dirmktms@gmail.com Website: www.mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र.पणन-५/कृउबास/लेखाप./परिपत्रक/ 1355/२०१५. दिनांक : २७ मार्च, २०१५

**-: परिपत्रक :-**

विषय : **कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या वैधानिक लेखापरिक्षणाबाबत.**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ खालील नियम ११६ नुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे ( यापुढे " बाजार समित्यांचे " असे संबोधन्यात येईल.) लेखापरिक्षण शासकीय लेखापरिक्षकांकडून करुन घेण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे, लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल व वैधानिक लेखापरिक्षण अहवाल छाननी इत्यादी संदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ) लेखापरिक्षण वाटप कार्यक्रम :**

१. जिल्हा उपनिबंधक यांनी प्रत्येक वर्षी ३१ मार्च अखेरच्या नोंदणीकृत बाजार समित्यांची यादी जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना ५ एप्रिल पर्यंत पाठवावी जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांनी यापुढे दिलेल्या निकषानुसार सादर केलेल्या यादीप्रमाणे शासकीय लेखापरिक्षकांची नावे बाजार समित्यांच्या लेखापरिक्षणासाठी प्रस्तावित करुन यादी विभागीय सहनिबंधक (प्रशासन) यांचेकडे १५ एप्रिल पर्यंत संयुक्त स्वाक्षरीने सादर करावी.

२. विभागीय सहनिबंधक (प्रशासन) यांनी विभागातील सर्व जिल्हयांची यादी एकत्र करुन खालील समितीमध्ये यादी अंतिम करण्याची कार्यवाही पूर्ण करुन सदरची यादी मंजूरीस्तव पणन संचालकांकडे ३० एप्रिल पर्यंत सादर करावी. यादी अंतिम करणेसाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) | अध्यक्ष |
| २ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) | सहअध्यक्ष |
| ३ | संबंधीत जिल्हा उपनिबंधक | सदस्य |
| ४ | संबंधीत जिल्हा विशेष लेखापरिक्षक | सदस्य |
| ५ | विभागीय उपनिबंधक / सहाय्यक निबंधक | सदस्य सचिव |

सदर यादीनुसार पणन संचालक १५ मे पर्यंत मंजूरी देवून संबंधीत जिल्हा उपनिबंधक / जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना आदेशीत करतील.

**ब) लेखापरिक्षण वाटप निकष :** बाजार समित्यांचे लेखापरिक्षण वाटप करतांना खालीलप्रमाणे निकष विचारात घ्यावेत.

I. बाजार समित्यांची उत्पन्नानुसार वर्गवारी

| अ.क्र. | बाजार समित्यांची वर्गवारी | उत्पन्नानुसार | शासकीय लेखापरिक्षक |
|---|---|---|---|
| १ | **अ** वर्ग बाजार समित्या | रु.१ कोटीचे वर उत्पन्न | विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ / जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ / सहनिबंधक (लेखापरिक्षण) |
| २ | **ब** वर्ग बाजार समित्या | रु.५० लाख ते १ कोटीपर्यंत | विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२ |
| ३ | **क** वर्ग बाजार समित्या | रु.२५ लाख ते ५० लाखापर्यंत | लेखापरिक्षक, श्रेणी-१ / लेखापरिक्षक, श्रेणी-२ |
| ४ | **ड** वर्ग बाजार समित्या | रु.२५ लाखापेक्षा कमी उत्पन्न | लेखापरिक्षक, श्रेणी-२ / उपलेखापरिक्षक |

**टिप :** मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे वैधानिक लेखापरिक्षण हे सहनिबंधक (लेखापरिक्षण), मुंबई / विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण), मुंबई यांचेकडे राहील.

II. शासकीय लेखापरिक्षकांना त्यांचे मुख्यालय ठिकाणच्या बाजार समित्यांचे प्राधान्याने वाटप करावे आणि मुख्यालय पातळीवर बाजार समिती नसल्यास नजीकच्या अंतरावरील बाजार समितीचे वाटप करावे.

III. एखादया लेखापरिक्षकाने मार्च अखेर बाजार समितीचे लेखापरिक्षण प्रगतीपथावर अथवा थकित ठेवले असेल तर ती बाजार समिती चालू वर्षी त्याच लेखापरिक्षकांना वाटप करावी. मात्र संबंधीत लेखापरिक्षक सेवानिवृत्त वा जिल्हयाबाहेर बदली झालेला असल्यास अथवा पणन संचालनालयाचे विशेष आदेश असतील तर ती अन्य लेखापरिक्षकांना वाटप करता येईल.

IV. बाजार समित्यांचे वर्गवारीअंतर्गत वाटप करताना शासकीय लेखापरिक्षकांची अनेक पदे असल्यास त्यांची वरिष्ठता व सेवा जेष्ठतेनुसार वाटप प्रस्तावित करण्यात यावे.

V. वरीलप्रमाणे एकाच बाजार समितीचे सलग तीन वेळेस लेखापरिक्षण केलेल्या संबंधीत लेखापरिक्षकांना त्याच बाजार समितीचे लेखापरिक्षणासाठी वाटप करता येणार नाही.

VI. शासकीय लेखापरिक्षकांनी वरीलप्रमाणे वाटपानुसार लेखापरिक्षण करताना मागील थकीत कालावधीपासून अद्ययावत पर्यंतचे लेखापरिक्षण करावयाचे आहे.

VII. वर्गवारीनुसार बाजार समित्यांची उपलब्धता नसल्यास शासकीय लेखापरिक्षकांना एक स्तर खालच्या वर्गवारीतील संस्थांचे वाटप करता येईल. तसेच वर्गवारीनुसार उपलब्ध असलेल्या बाजार समित्यांसाठी त्याप्रमाणे शासकीय लेखापरिक्षक उपलब्ध नसल्यास एक स्तर खालच्या किंवा वरच्या श्रेणीतील लेखापरिक्षकांना वाटप करता येईल.

VIII. सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण संबंधीत कायदयाखालील तरतुदीनुसार ३१ जुलै पर्यंत पूर्ण करावयाचे असल्याने बाजार समित्यांचे लेखापरिक्षण ऑगस्ट ते मार्च अखेरपर्यंतच्या कालावधीच्या वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रमात समाविष्ठ करुन **ऑगस्ट अखेरपर्यंत** लेखापरिक्षण पूर्ण करावे. तथापी, ज्या लेखापरिक्षकांकडे ठरावांन्वये अथवा परंतुकान्वये सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी वाटप झालेले नाही किंबहुना गणक / निकषानुसार लेखापरिक्षण कामकाज पुरेसे उपलब्ध नसेल तर अशा लेखापरिक्षकांना प्राधान्याने वाटप करुन जुलै पूर्वीच्या कालावधीत बाजार समित्यांचे लेखापरिक्षण त्यांचे वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रमामध्ये समाविष्ठ करण्यात यावे.

IX. शासकीय लेखापरिक्षकाने बाजार समित्यांचे लेखापरिक्षण पूर्ण केल्यानंतर १५ दिवसांचे आत लेखापरिक्षण अहवाल बाजार समितीस तसेच पणन संचालक, संबंधीत जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक व एक स्थळ प्रत याप्रमाणे ५ प्रतीत सादर करावा.

X. शासकीय लेखापरिक्षकाने बाजार समित्यांच्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये काही गंभीर बाबी आढळून आल्यास त्यासंबंधीचा सविस्तर विशेष अहवाल कायदेशीर / प्रशासकीय कारवाईसाठी स्वतंत्रपणे जिल्हा उपनिबंधक / पणन संचालक यांचेकडे जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांचेमार्फत सादर करावा.

XI. संबंधीत वैधानिक लेखापरिक्षकाने बाजार समितीने केलेल्या उल्लेखनिय बाबी तसेच कामकाजात सुधारणा योग्य बाबी सूचित करणारा गोषवारा/अहवाल लेखापरिक्षण अहवालासमवेत स्वतंत्रपणे सादर करावा.

XII. वरील सूचना क्रमांक ११ मध्ये नमूद गोषवारा व आर्थिक पत्रके जिल्हा उपनिबंधक यांनी शासन व पणन संचालनालयाचे संकेत स्थळावर (Website) वर प्रसिध्द करावेत.

**क) दोषदुरुस्ती अहवाल :**

I. शासकीय लेखापरिक्षकांने वैधानिक लेखापरिक्षण अहवाल सादर केल्यापासून तीन महिन्याच्या आत बाजार समितीने त्यांचा दोषदुरुस्ती अहवाल तीन प्रतीत संबंधीत शासकीय लेखापरिक्षक यांचेकडे सादर करावा आणि संबंधीत लेखापरिक्षकानी दोषदुरुस्तीवर आपले अभिप्राय नोंदवून तो जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांचे मार्फत जिल्हा उपनिबंधक / पणन संचालक यांना सादर करावा.

II. वरील प्रमाणे दोषदुरुस्ती अहवाल प्राप्त झाल्यानंतर असमाधानकारक दोषदुरुस्तीचे मुद्दे संबंधीत बाजार समित्यांना कळविण्याची कार्यवाही जिल्हा उपनिबंधकांनी एक महिन्याचे आत पूर्ण करावी व त्याची प्रत पणन संचालक यांना सादर करावी.

III. ज्या बाजार समित्यांचे दोषदुरुस्ती अहवाल वरील मुदतीत प्राप्त झालेले नाहीत त्यांना संबधीत शासकीय लेखापरिक्षकाने त्वरीत पत्रव्यवहार करुन दोषदुरुस्ती अहवाल तीन महिन्यात प्राप्त करुन घ्यावेत. तदनंतर दोषदुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या बाजार समित्यांचे संदर्भात कायदेशीर कारवाईसाठीचा अहवाल जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांचेमार्फत जिल्हा उपनिबंधक यांचेकडे सादर करावा.

IV. बाजार समित्यांचे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची छाननी त्याच श्रेणीतील किंवा त्यापेक्षा वरच्या श्रेणीतील अन्य शासकीय लेखापरिक्षकांकडून करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण अहवाल प्राप्तीपासून तीन महिन्यांचे आत पूर्ण करावी आणि अहवाल छाननीमध्ये काही गंभीर बाबी आढळून आल्यास त्या बाजार समित्यांचा विशेष अहवाल प्रशासकीय / कायदेशीर कारवाईसाठी संबंधीत जिल्हाउपनिबंधकांना सादर करावेत.

सदर परिपत्रकीय सूचनांची काटेकोर अंमलबजावणी सर्व संबंधीतांनी सन २०१५-२०१६ चे वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रमापासून करण्याची दक्षता घ्यावी.

**( दिनेश ओऊळकर )**
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक , सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरिक्षण) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. अपर मुख्य सचिव (पणन), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.